# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डी मेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ८६५२२८१०२६

**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, and Mumbai-400 001
Website: www.msbnpe.org E-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- 8652281026


क्र. मराशुवपशिमं/परिपत्रक/१४६८९ /२०२३ दिनांक:- १४ / १२ /२०२३

प्रति,
प्राचार्य/परिचर्या अधिकारी/संस्थाप्रमुख,
सर्व संलग्न एल.एच.व्ही. व इतर परिचारीका
प्रशिक्षण संस्था.

विषय - शैक्षणिक वर्ष २०२३-२४ एल. एच.व्ही.नर्सिग नियमित परिक्षेसाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरणेबाबत.

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने सर्व एल. एच.व्ही. व इतर संलग्नित महाविद्यालयातील संस्थाप्रमुख व प्राचार्य यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ एल. एच.व्ही.नर्सिग नियमित परिक्षेसाठी विद्यार्थ्यांचे नोंदणीकरण व नोंदणीशुल्क ऑनलाईन पध्दतीने दिनांक **१८/१२/२०२३ ते २२/१२/२०२३** पर्यंत भरावेत. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ एल. एच.व्ही.नर्सिग नियमित परिक्षेसाठी महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाने ऑनलाईन परिक्षा फॉर्म उपलब्ध केलेले आहे. संस्थांनी परिक्षेचे फॉर्म व परिक्षा शुल्क ऑनलाईन पध्द्तीने दिनांक **२३/१२/२०२३ ते ३०/१२/२०२३** पर्यंत भरावेत. ऑनलाईन पध्द्तीने फॉर्म भरताना खालील पध्द्तीचा वापर करावा :

<u>विद्यार्थी परिक्षा नोंदणी</u> - (Student Exam Enrollment) २०२३ - २४ या शैक्षणिक वर्षासाठी Student Exam Enrollment साठी वापरण्यात आलेल्या user ID व Password वापरण्यात यावा. विद्यार्थ्यांच्या पी.आर.एन. क्रमांक टाकून विद्यार्थी परिक्षा नोंदणी करावी.

विद्यार्थी परिक्षा अर्ज (Online Exam Application) - विद्यार्थी परिक्षा नोंदणी झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने पी.आर.एन. क्रमांक टाकून अर्ज करावयाचे आहेत.
परिक्षा शुल्क दिनांक **२३/१२/२०२३ ते ३०/१२/२०२३** पर्यंत भरण्यात यावे. शुल्क भरताना खालील पध्दतीचा अवलंब करावा.

**परिक्षा शुल्क भरणेबाबत** :- परिक्षा शुल्क भरण्यासाठी पेमेंन्ट मेनू मध्ये जावून Pay Online (Blue Button) वरती क्लिक करुन Payment करावे. NEFT/RTGS/DD या पध्दतीने केलेले परिक्षा शुल्क स्विकारण्यात येणार नाही याची सर्व संलग्नित संस्थांनी नोंद घ्यावी.

**अंतर्गत टर्म नुसार मूल्यमापन गुणांची नोंदणीबाबत** - सदर परिक्षेसाठी फ्रेशर (म्हणजेच जुन्या बॅचचे असे विद्यार्थी ज्यांनी सदर परिक्षा दिली नाही ) असणाऱ्या विद्यार्थ्यांचे टर्म १ व टर्म २ अंतर्गत मूल्यमापन गुणांची नोंदणी दिनांक **०१/०१/२०२४ ते ०५/०१/२०२४** पर्यंत करण्यात यावी.

अंतिम अंतर्गत मुल्यमापन गुणांची नोंदणी दिनांक ०१/०१/२०२४ ते ०५/०१/२०२४ पर्यंत करावी. विहीत कालावधीत वरील बाबी पुर्ण न केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस संस्था जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.

टिप :- १. काही अडचणी आल्यास पुढील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा - ८९७६२७९९३१.
२. ज्या संस्था परिक्षा शुल्क दिलेल्या मुदतीत भरणार नाहीत त्या संस्थांना मंडळाच्या नियमाने लेट फी आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत : १. मा.संचालक,महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ.